# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

चौथा मजला, एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : ०२२-२२०२ ६२४९, २२८३ ५२४७, २२०२ ५३५४
ई-मेल : ms@mjp.gov.in / headquarters@mjp.gov.in / cao@mjp.gov.in
वेबसाईट : www.mjp.maharastra.gov.in


**परिपत्रक क्र.२१५**

**विषय:** ई-निविदा प्रसिध्दी प्रक्रियेबाबत.

**संदर्भ:** १. मजीप्राचे परिपत्रक क्र.१६६ दि.२.९.२०१५ व शुध्दीपत्रक दि.७.१२.२०१५
२. मजीप्राचे परिपत्रक क्र.२०८ दि.२३.३.२०१८

संदर्भिय परिपत्रक क्र.१ अन्वये, ई-निविदा वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याविषयीच्या कार्यप्रणालीच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

वृत्तपत्रामध्ये क्षेत्रिय कार्यालयांकडून निविदा सूचना वेळेवर प्रसिध्दीस न देणे, निविदा सूचना वेळेवर प्रसिध्द न होणे, उशिरा प्रसिध्द होणे, वृत्तपत्रामधील निविदा प्रसिध्दीबाबत संनियंत्रण न करणे या सर्व बाबी विचारात घेऊन संदर्भिय परिपत्रक क्र.२ अन्वये वृत्त पत्रामधील निविदा प्रसिध्दी विषयी क्षेत्रिय कार्यालयांकडून करावयाच्या संनियंत्रणाबाबत सविस्तर सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

अनेक निविदांच्या बाबतीत असे आढळून आले आहे की, निविदा सूचना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होण्यास काही कालावधी लागतो व निविदा वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर ऑनलाईन निविदा प्रसिध्दी करण्यात येते. त्याचप्रमाणे निविदा सादर करण्यास मुदतवाढ देताना/फेरनिविदा /दुबार/तिबार निविदा मागविताना प्रथम वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाते, जाहीरात वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतरच्या दिनांकापासून निविदा डाऊनलोडींग व निविदा प्रक्रियेतील इतर बाबी सुरु होतात. त्यामध्ये विनाकारण कालापव्यय होतो व निविदा प्रक्रियेस विलंब होतो.

वरील बाबी विचारात घेऊन पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.



(महाराष्ट्र शासन उपक्रम)
पाणी हे जीवन आहे ! पाण्याची बचत करा !

## अ) प्रथमत: निविदा काढताना करावयाची कार्यवाही :-

योजनांच्या प्रथमत: निविदा काढताना यापुढे प्रथम ऑनलाईन निविदा पोर्टलमध्ये, निविदा तात्काळ अपलोड करण्यात यावी. त्याचप्रमाणे निविदेचे वेळापत्रक त्याच तारखेपासून सुरु होईल असे बघावे. निविदा सूचना वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्दीस देण्यासाठी पाठविण्यात यावी. त्यामध्ये सदर निविदा ऑनलाईन प्रसिध्द केल्याबाबत व त्याची तारीख वेबपोर्टलच्या नावासह नमूद करण्यात यावे.

यासाठी वर्तमानपत्रामध्ये द्यावयाच्या जाहीरातीचा नमुना पुढीलप्रमाणे देण्यात येत असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN**
**e-Tender Notice for**

MJP invites e-Tender notice for the work of ............ Water Supply Scheme at Taluka ....................... District......................... in the State of Maharashtra, valued at Rs.................. Crore. The e-Tender details are available on www.mahatenders.gov.in from dated ..............

All relevant dates will be as per the tender published in web portal www.mahatenders.gov.in

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**ई-निविदा सूचना क्र....... सन ..........**

.................... पाणी पुरवठा योजना तालुका-................ जिल्हा................. या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रु............ कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि................ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

**ब) फेरनिविदा /दुबार/तिबार निविदा मागणीच्या वेळी करावयाची कार्यवाही :-**

फेरनिविदा/दुबार/तिबार निविदा मागणीच्या वेळी निविदा प्रक्रिया करताना अशा प्रकारे निविदा मागविण्याचा निर्णय झाल्यानंतर त्वरीत त्याचवेळी निविदा सूचना प्रसिध्दीसाठी रितसर देण्यात यावी. त्यामध्ये सदर निविदा ऑनलाईन प्रसिध्द केल्याबाबत व त्याची तारीख वेबपोर्टलच्या नावासह नमूद करण्यात यावे.

यासाठी वर्तमानपत्रामध्ये द्यावयाच्या जाहीरातीचा नमुना पुढीलप्रमाणे देण्यात येत असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN**
**e-Tender Notice for**
**(Retendering Second Call/ Third Call)**

MJP invites e-Tender notice for the work of ............ Water Supply Scheme at Taluka ...................... District......................... in the State of Maharashtra, valued at Rs................. Crore. The e-Tender details are available on www.mahatenders.gov.in from dated ..............

All relevant dates will be as per the tender published in web portal www.mahatenders.gov.in

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**ई-निविदा सूचना क्र....... सन ..........**
**(फेरनिविदा प्रक्रिया व्दितीय मागणी/ तृतीय मागणी)**

.................... पाणी पुरवठा योजना तालुका-............... जिल्हा................. या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रु........... कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि................ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

**क) निविदा सादर करण्याच्या कालावधीतील मुदतवाढीबाबत करावयाची कार्यवाही :-**

अपुऱ्या प्रतिसादामुळे निविदा प्रक्रियेस मुदतवाढ देण्याची वेळ आल्यास, त्यावेळी त्वरीत ऑनलाईन निविदा पोर्टलमध्ये प्रथम निविदेस मुदतवाढ देण्यात यावी. या निविदेस मुदतवाढ देण्यात आल्याबाबत मुदतवाढीनंतरच्या निविदेतील विविध तारखांबाबत शुध्दीपत्रक तात्काळ वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्दीस देण्यासाठी पाठविण्यात यावे. मुदतवाढीनंतरच्या निविदा प्रक्रियेतील विविध तारखांची वेबपोर्टलवर मुदतवाढ दिल्याच्या तारखेपासून परिगणना करण्यात यावी.

यासाठी वर्तमानपत्रामध्ये द्यावयाच्या जाहीरातीचा नमुना पुढीलप्रमाणे देण्यात येत असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN

**(Extension of Submission Date)**

**Corrigendum No.**

e-Tender Notice No........... for year.............. for the work of .......................... Water Supply Scheme at Taluka .............................. District......................... in the State of Maharashtra.

The bid submission time limit for above e-Tender is extended from Dt.................... . Detailed tender programme dates and other details are available on www.mahatenders.gov.in web portal from dated..............

All relevant dates will be as per the tender published in web portal www.mahatenders.gov.in

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**निविदा सादर करण्याच्या मुदतीत वाढ**

**शुध्दीपत्रक क्र.**

ई-निविदा सूचना क्र........ सन ............... नुसार प्रसिध्द झालेल्या ...................... पाणी पुरवठा योजना तालुका-............... जिल्हा................. या कामाच्या निविदा सादर करण्याच्या प्रक्रियेस दिनांक ................. पासून मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

याबाबतचा सविस्तर तपशील दि............ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सूचनांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर म.ना.से. नियमामधील तरतूदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

(पी. वेलरासू)
**सदस्य सचिव**

**जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/** ९००३
**दि.३१ जुलै, २०१८**
दि. १ ऑगस्ट, २०१८

**प्रत माहिती व अनुपालनाच्या कार्यवाहीसाठी :**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद/ नागपूर / अमरावती.
- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवीमुंबई
- अधीक्षक अभियंता, महा. जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गु.प.द.प., महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/ पुणे/ सांगली/ औरंगाबाद / लातूर / नांदेड / नाशिक / अहमदनगर/ अमरावती / अकोला / नागपूर / चंद्रपूर.
- अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे /नागपूर.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे / अंबरनाथ (जव्य)/ विरार (जव्य)/ पनवेल (जव्य)/ माणगांव/ रत्नागिरी/ सिंधुदूर्गनगरी / पुणे-१ / पुणे-२ / कराड / सातारा (जव्य) / सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ उस्मानाबाद/ नांदेड/ परभणी/ जळगाव/ नाशिक/ नाशिक (जव्य)/ अहमदनगर/ संगमनेर/ अमरावती/ अमरावती (जव्य)/ यवतमाळ/ अकोला/ वाशिम / बुलढाणा/ नागपूर/ नागपूर (जव्य)/ गोंदिया/ चंद्रपूर/ वर्धा.
- तांत्रिक शाखा-१ व ३ यांना माहिती व कार्यवाहीसाठी.